| MHND260005282024 | दाखल तारीख | : | ३०/०७/२०२४ |
|---|---|---|---|
| | नोंदणी तारीख | : | ३०/०७/२०२४ |
| | निकाल तारीख | : | १८/०४/२०२६ |
| | कालावधी | : | **०१ वर्ष ०८ महिने १९ दिवस** |

| | |
|---|---|
| **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग अर्धापुर, यांचे न्यायालयात**<br>(पीठासीन अधिकारी - **श्रीमती आर. बी. सोरेकर**)<br>(घोषित दिनांक १८/०४/२०२६) | |
| **संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१८२/२०२४** | **निशाणी क्र.१० लगत** |
| गुन्हा रजि. क्र.७४/२०२४ | पोलीस ठाणे अर्धापुर. |

| | |
|---|---|
| फिर्यादी | महाराष्ट्र शासन तर्फे पोलीस ठाणे अर्धापुर. |
| प्रतिनिधीत्व | श्री. व्ही.एम.परदेशी. |
| आरोपी | कौशल अशोकराव निडारकर<br>वय- ३२ वर्षे, व्यवसाय- व्यापार<br>रा. अशोक कॉलनी, भोकर ता. भोकर जि. नांदेड. |
| प्रतिनिधीत्व | श्री. शेख मुजाहेद. |

**भाग- ब**

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | १४/०२/२०२४ |
| पहिली खबर दिनांक | २६/०२/२०२४ |
| दोषारोपपत्रचा दिनांक | २९/०७/२०२४ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | १३/०९/२०२४ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | १८/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक | --- |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | १८/०४/२०२६ |
| शिक्षा दिल्याची तारीख , आदेश | निर्दोष मुक्त. |

## आरोपीचा तपशील

| आरोपी अ.क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनवर सोडल्याची | दोषारोप / गुन्हा | निर्दोष मुक्त केले किंवा | दिलेली शिक्षा | सुनावणी दरम्यान |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | तारीख | | शिक्षा दिली | | जेलमध्ये असल्याचा कालावधी कलम ४२८ फौज. प्र. सं. |
| १. | कौशल अशोकरराव निडारकर | -- | -- | भारतीय दंड संहिता कलम २७९,३३७ आणि ३३८ | निर्दोष मुक्त | -- | -- |

**भाग - क**

## अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यादी / बचाव / न्यायालयाचे साक्षीदार

### अ. अभियोगपक्ष

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार ) |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | सोपान छत्रपती राजेगोरे | फिर्यादी |
| अ.सा.क्र.२ | ज्ञानेश्वर छत्रपती राजेगोरे | जखमी तथा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |

### ब. बचाव साक्षीदार, इतर

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

### क. न्यायालयीन साक्षीदार, जर

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## अभियोगपक्षाचे/बचाव/न्यायालयीन निशाणी

### अ. अभियोगपक्ष

| अनु.क्र. | निशाणी क्र. | तपशील / वर्णन |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**बचाव पक्षाने मान्य केलेले कागदपत्रे**

| अनु.क्र. | निशाणी क्र. | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | १४ | घटनास्थळ पंचनामा |
| २. | १५ | वैदयकीय प्रमाणपत्र |

**ब. बचावपक्ष नि.क्र. यादी**

| अनु.क्र. | निशाणी क्र. | तपशील / वर्णन |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**क. न्यायालय नि.क्र. यादी**

| अनु.क्र. | निशाणी क्र. | तपशील / वर्णन |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**ड. मुद्देमाल / वस्तु**

| अनु.क्र. | मुद्देमाल / वस्तु क्र. | तपशील / वर्णन |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**न्यायनिर्णय**

(पारित दिनांक १८ एप्रिल, २०२६)

आरोपी हा भारतीय दंड संहिता कलम २७९,३३७ आणि ३३८ अन्वये अपराधाच्या आरोपासाठी संपरीक्षेला समोर गेला आहेत.

२. आरोपी विरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम २७९,३३७ आणि ३३८ अन्वये खटला प्रलंबित आहे. आरोपीचे प्रतिकथन नि.क्र.१० अन्वये नोंदविले. आरोपीने गुन्हा कबूल न केल्याने खटल्याची संपरिक्षा घेण्यात आली. अभियोगपक्षाने दोन साक्षीदारांना तपासले. आरोपी विरुध्द दोषहार्य पुरावा मिळून न आल्याने आरोपीचे फौ.प्र.संहिता चे कलम ३१३ अन्वये निवेदन नोंदविण्यात आले नाही.

३. खालील मुद्दे विचारार्थ उद्भवतात व त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसे सहित खालीलप्रमाणे नोंदविलेले आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १) | अभियोगपक्षाने असे सिध्द केले काय की, दिनांक १४/०२/२०२४ रोजी १८.०० ते १८.३० वाजता शेलगाव पाटीजवळ ता. अर्धापुर जि. नांदेड येथे आरोपीने त्याच्या ताब्यातील कार क्रमांक एम.एच.-२६-ए.के.-६४०८ ही मानवी जिवन धोक्यात येईल अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापत अगर क्षती पोहोचविण्याचा संभव असेल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने चालविली ? | नकारार्थी |
| २) | अभियोगपक्ष सिध्द करतो काय की, वरील तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमूद वाहन निष्काळजीपणे रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून आजूबाजूच्या परिस्थितीचे भान न ठेवता व्यक्तिगत सुरक्षितता धोक्यात आणणा-या कृतीने चालवून फिर्यादी व साक्षीदाराला गंभीर दुखापत केली ? | नकारार्थी |
| ३) | अभियोगपक्ष सिध्द करतो काय की, वरील तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमूद वाहन निष्काळजीपणे रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून आजूबाजूच्या परिस्थितीचे भान न ठेवता व्यक्तिगत सुरक्षितता धोक्यात आणणा-या कृतीने चालवून फिर्यादी व साक्षीदाराला साधी दुखापत केली? | नकारार्थी |
| ४) | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ ते ३ करीता :**

४. सोपान छत्रपती राजेगोरे (सा.क्र.१) याच्या पुराव्यानुसार, घटनेची तारीख त्यांना आठवत नाही. घटना दिड वर्षापुर्वी शेलगाव पाटीजवळ नागपुर ते नांदेड जाणा-या हायवे रोडवर संध्याकाळी ०६.०० वाजण्याच्या सुमारास घडली. त्यांना फोन आला होता की, त्यांचा भाऊ ज्ञानेश्वर छत्रपती राजेगोरे याचा अपघात झाला आहे. त्यामुळे ते व त्यांचे चुलते दत्ता तुकाराम राजेगोरे असे गाडीने अपघातच्या ठिकाणी गेले. तेथे आल्यावर त्यांना त्यांचा भाऊ रोडवर पडलेला दिसला. त्यांच्या भावाचा डावा पाय फ्रॅक्चर झाला होता. त्यांच्या भावाला कारने उडवल्याचे त्यांना कळाले होते. सदर कारचा नंबर त्यांना आठवत नाही. त्यानंतर त्यांनी त्यांच्या भावाला यशोसाई हॉस्पीटल, नांदेड येथे घेवुन गेले. तेथे डॉक्टरांनी

त्यांच्या भावाच्या पायात रॉड टाकला व कंबरेला प्लेट टाकली. सदरचा अपघात कोणी व कसा केला याबाबत त्यांना माहिती नाही तसेच याबाबत कोणाकडुन काहीही कळाले नाही. त्यांना सदर कार चालक कोण होता व त्याचे नाव माहित नाही. त्यांनी फिर्याद व छापील प्रथम खबरी अहवालवरील सही ओळखुन त्यामध्ये काय लिहिले आहे ते त्यांना आठवत नसल्याचे सांगितले आहे. फिर्यादी अभियोगपक्षास सहकार्य करीत नसल्याने अभियोगपक्षातर्फे विद्वान सरकारी वकिलांनी सदर साक्षीदारांना उत्तरसुचक प्रश्न विचारले असता अभियोगपक्षास उपयुक्त असे काहीही अभिलेखावर आलेले नाही. आरोपीच्या वकीलांनी उलटतपास नाकारला.

५. जखमी साक्षीदार ज्ञानेश्वर छत्रपती राजेगोरे (सा.क्र.२) याच्या पुराव्यानुसार, फिर्यादी हा त्यांचा सख्खा छोटा भाऊ आहे. घटना दिनांक १४.०२.२०२४ संध्याकाळी ६ ते ६.३० वाजण्याच्या सुमारास कुबोटा शोरूमच्या समोर नांदेड हिंगोली रोडवर घडली. त्यादिवशी ते गावाकडे पायी जात असतांना पाठीमागुन एका पांढ-या रंगाच्या कारने त्यांना धडक दिली. त्यांना कारचा नंबर आता आठवत नाही. सदर धडक दिल्यामुळे ते बेशुध्द झाले. त्यांचा भाउ, चुलते व गावातील काही लोकांनी त्यांना यशोसाई हॉस्पीटल नांदेड येथे नेले. सदर अपघातात त्यांच्या डावी मांडीमध्ये रॉड टाकण्यात आला. तसेच त्यांच्या पोटाच्या खाली गंभीर दुखापत झाल्यामुळे प्लेट टाकण्यात आली. तसेच त्यांच्या डोळयाखाली मार लागला होता व डोक्याला खरचटले होते. सदर अपघातात ते बेशुध्द पडल्यामुळे त्यांनी कार चालकाला पाहिले नव्हते. ते सदर कार चालकाला आत्ता पाहिल्यास ओळखु शकत नाही. तसेच त्यांना कारचा क्रमांक सांगता येत नाही तसेच त्यांना इतर काही सांगता येत नाही. सदर जखमी साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करीत नसल्याने अभियोगपक्षातर्फे विद्वान सरकारी वकिलांनी सदर साक्षीदारांना उत्तरसुचक प्रश्न विचारले असता त्याला दवाखान्यात शुध्द आल्यानंतर त्याच्या भावाला अपघाताबाबत सांगितले होते तसेच त्याला त्याच्या भावाने कारचा क्रमांक एम.एच.-२६.-ए.के.-६४०८ च्या कारचालकाने त्याला पाठीमागुन धडक दिली होती असे सांगितले होते परंतु, त्याने कारचा नंबर पाहिला नव्हता असे मान्य केले आहे. तसेच सदर साक्षीदाराने उलटतपासादरम्यान त्याने व त्याच्या भावाने न्यायालयाबाहेर आपसी समझोता केला असल्याचे मान्य केले आहे. आरोपीच्या वकीलांनी उलटतपास नाकारला.

६. फिर्यादी तसेच जखमी साक्षीदार क्र. २ यांच्या पुराव्यावरुन, ज्या वाहनाने अपघात झाला त्या वाहन चालकाला ते ओळखु शकत नाही. तसेच सदर गाडीचा नंबर देखील ते सांगु शकत नाहीत. तसेच सदरची गाडी आरोपी चालवत होता हे देखील त्यांच्या पुराव्यात कुठेही आले नाही. तसेच फिर्यादीने त्याच्या उलटतपासात आरोपी व त्यांच्यामध्ये न्यायालयाबाहेर आपसी समझोता झाला आहे

असे मान्य केले आहे. तसेच फिर्याद वरील त्याची सही ओळखली परंतु त्यातील मजकुर माहित नसल्याचे सांगितले त्यामुळे आरोपीने त्याच्या ताब्यातील कार क्रमांक एम.एच.-२६-ए.के.-६४०८ ही हयगयीने व निष्काळजीपणाने चालवुन सदरचा अपघात घडवुन आणला हे सिध्द होत नाही.

७. आरोपीच्या वकीलांनी जरी घटनास्थळ पंचनामा आणि वैदयकीय प्रमाणपत्र हे स्वीकृत केले व त्यामुळे फिर्यादीच्या भावाला दुखापत झाली हे सिध्द होत असले तरी सदर प्रकरणात फिर्यादी व जखमी साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करत नाहीत तसेच त्यांच्या पुराव्यात कुठेही आरोपीने त्याच्या ताब्यातील सदरची कार हयगयीने व निष्काळजीपणाने चालवुन फिर्यादी व साक्षीदाराला धडक देवुन गंभीर तसेच साध्या स्वरुपाची जखम पोहचवली हे अभियोगपक्ष सबळ पुराव्याअभावी सिध्द करु शकले नाही. करिता आरोपी हा वर नमुद गुन्हयातुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब, मी मुद्दा क्रमांक १ ते ३ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवुन मुद्दा क्रमांक ४ साठी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आ दे श</u>

१) आरोपी कौशल अशोकराव निडारकर यास भारतीय दंड संहितेचे कलम २७९,३३७ आणि ३३८ अन्वये अपराधाच्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५(१) अन्वये निर्दोषमुक्त करण्यात येत आहे.

२) आरोपीचे वैयक्तिक बंधपत्र व जामीनकतबा रद्द करण्यात येतो.

३) आरोपीने फौ.प्र.संहिता कलम ४३७-अ च्या पूर्ततेकामी रुपये ५०,०००/- बंधपत्र द्यावे.

स्वा/-
**(श्रीमती आर.बी.सोरेकर)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
अर्धापुर.

दिनांक १८/०४/२०२६

**<u>Certificate</u>**

I affirm that the contents of this P.D.F file Judgment/Order are same word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Court Name | | Smt. R.B.Sorekar,<br>C.J.J.D & J.M.F.C, Ardhapur |
| Date | - | 18/04/2026 |
| Order signed by the presiding officer on | - | 18/04/2026 |
| Order uploaded on | - | 18/04/2026 |
| Order uploaded by | - | A. V. Shahane (Jr. Clerk) |